# सहसंचालक,तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, नागपूर

शासकिय तंत्रनिकेतन परिसर, सदर, नागपूर

दुरध्वनी क्रं.:- ०७१२-६४६५१४५/१४६, फॅक्स क्रं.:- ०७१२-२५६१६६३

Web Site :- www.rdtenagpur.org.in E-Mail :- ronagpur@dtemaharashtra.gov.in


क्रमांक :- तंशिस/विकाना/डीबीटी पोर्टल /2019-20/3336

दिनांक 06 NOV 2019

प्रति,

प्राचार्य /संचालक,

सर्व शासकीय, खाजगी विनाअनुदानित व कायम विनाअनुदानित,

पदवी/पदव्युत्तर पदवी व पदविका संस्था ,

नागपूर विभाग. नागपूर

**विषय:- विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती योजनांचा लाभ मिळण्यासाठी डी.बी.टी. पोर्टलवर विद्यार्थ्यांनी भरलेल्या अर्जावरील प्रलंबित कार्यवाही त्वरित पुर्ण करण्यांबाबत.**

संदर्भ :- 1) या कार्यालयांचे पत्र क्र. तंशिस/विकाना/डीबीटी पोर्टल/2421/ दि. 7/08/2019.

2) या कार्यालयांचे पत्र क्र. तंशिस/विकाना/डीबीटी पोर्टल/2926/ दि. 23/09/2019.

3) मा. संचालक,तंशिसं,म.रा.मुंबई यांचे कार्यालयाचे पत्र क्र.18/तंशिसं/डीबीटी-पोर्टल-/2019/460/ दि.15/10/2019

4) मा. संचालक,तंशिसं,म.रा.मुंबई यांचे कार्यालयाचे पत्र क्र.18/तंशिसं/डीबीटी-पोर्टल-/2019/492/ दि.05/11/2019

शैक्षणिक वर्ष 2019-20 करिता महाडीबीटी पोर्टल वरील योजनांच्या अंमलबजावणी साठी, पोर्टलवर जाहीर केलेल्या वेळापत्रकांनुसार प्राप्त झालेल्या अर्जावर कार्यवाही करण्यांकरिता तसेच पात्र विद्यार्थी संबंधित योजनांच्या लाभापासुन वंचित राहू नये. याकरिता उपरोक्त संदर्भीय पत्र क्र. 01 व 02 अन्वये आपणांस कळविण्यांत आलेले होते. परंतु नागपूर विभागांतर्गत येत असलेल्या संस्थेच्या लॉगीनमध्ये आतापर्यंत 13,162 विद्यार्थ्यांचे अर्ज प्राप्त झालेले असुन त्यापैकी 3,813 अर्ज संस्थांस्तरावर प्रलंबित असल्यांचे निदर्शनास आलेले आहे.

तथापि पुनःश्च आपणांस कळविण्यांत येते की, आपल्या संस्थेमध्ये शिकणा-या पात्र विद्यार्थ्यांकडून संबंधित योजनेंचे नवीन व नूतनीकरणांचे अर्ज तात्काळ भरुन घ्यावे व संस्थांनी त्यांच्या लॉगीनमध्ये प्राप्त होणा-या अर्जाची छाननी प्रक्रिया प्रलंबित न ठेवता पात्र विद्यार्थ्यांचे अर्ज **दि.** 20/11/2019 पर्यंत नचुकता विभागीय कार्यालयांस मंजूरीस पाठविण्यांत यावे. जेणे करून लाभार्थी विद्यार्थीचे अर्ज मंजूरीकरिता विहीतमुदतीत वरीष्ठ कार्यालयास पाठविणे शक्य होईल. तद्नंतर पात्र विद्यार्थी सदर योजनेंपासुन वंचित राहणार नाही., यांची सर्वस्वी जबाबदारी संस्थाप्रमुखांची राहील.

(डॉ. राम निबुदे)

प्र. सहसंचालक,

तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,

नागपूर